## निशाणी क्र. २१ वरील आदेश

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६ नियम–१७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा हक्क शाबितीसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामकाज चालू असतांना प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सोमनाथ मारुती मासाळ यांच्याशी संगनमत करुन खोटा व बनावट दस्त अस्तित्वात आणला. सदर दस्ताबाबत दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे असे कथन आहे की, सदर दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र. २ यांच्यानंतर ३ असा अंक लिहून सोमनाथ मारुती मासाळ यांना प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्यात समाविष्ठ करुन घेण्यात यावे तसेच दावा कलम ८ नंतर ८ अ, तसेच ११ड नंतर ११ई असे कलम नमुद करुन त्यामध्ये अर्जात नमुद केलेला मजकूर दुरुस्त करण्यात यावा अशी विनंती केली.

३. वादी पुढे असे नमुद करतो की, वर नमुद केलेला दस्त हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दि. १६/०४/२०२४ रोजी तयार केला आहे. सदरचा दस्त दावा दाखल केल्यानंतर बनविलेला असल्यामुळे सदरची दुरुस्ती दाव्यात नमुद करणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार आहे. याउलट दाव्याची योग्य निराकरण होण्याकरिता नमुद दुरुस्ती गरजेचे आहे.

४. प्रस्तुत अर्जात प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नि. क्र. २५ कडे म्हणणे

दाखल केले व अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. प्रतिवादींचे असे कथन आहे की, संभाव्य प्रतिवादी क्र. ३ यांना प्रतिवादी पणात सामील करण्यापूर्वी त्यांना अर्जाची नोटीस काढून त्यांचे म्हणणे दुरुस्त करणे आवश्यक आहे. तसेच पुढे असे कथन करतात की, वादीने दुरुस्ती अर्जामध्ये दस्त वादीच्या हिस्सयावर बंधनकारक नाही असे कथन केले आहे. परंतु त्या दुरुस्तीवर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प देणे आवश्यक आहे. कोर्ट फी स्टॅम्प दिल्याशिवाय वादीचा दुरुस्ती अर्ज कायद्याने चालणार नाही सबब तो अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

५. वादीचा अर्ज पाहिला व विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

६. वादीच्या दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुतचा दावा जाहिर ठरावाकरिता व निरंतर ताकीद हूकूमाकरिता दाखल केला आहे. सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असल्याने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकतीबाबत संभाव्य प्रतिवादी क्र. ३ यांच्याबाबत दि. १६/०४/२०२४ रोजी नोंदणीकृत खरेदीखत केल्याचे दिसून येते. सदरची बाब दावा दाखल केल्यानंतर घडलेली आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दाव्याचे कामकाज प्रलंबित असतांना संभाव्य प्रतिवादी क्र. ३ यांचे हक्क दावामिळकतीमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे संभाव्य प्रतिवादी क्र. ३ हे दाव्याचे आवश्यक पक्षकार आहेत. दाव्याचा हुकूमनामा पारित करण्याकरिता या दाव्याच्याकामी सर्व आवश्यक पक्षकार दाव्यामध्ये समाविष्ट असणे गरजेचे आहे. तसेच दाव्याचे संपूर्णपणे निराकरण होण्याकरिता संभाव्य प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्यात समाविष्ट करणे हितावह आहे. संभाव्य प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्यात समाविष्ट करुन घेतल्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीने दाखल केलेला अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी खालील आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादींनी विहीत कालावधीत अर्जात नमुद केल्याप्रमाणे योग्य ती दुरुस्ती करावी व तशी दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी. |

सही/-
(पी.आर.पाटील)
६वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
पंढरपूर

दिनांक - ०२.१२.२०२४

## Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | P. S. Kore |
| Court | - | 6th Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 02.12.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 02.12.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 02.12.2024 |